नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांकः-२१/७/२०२०

**-:परिपत्रः-**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्र. १ (के) अन्वये शुक्रवार दिनांक १७ जुलै २०२० रोजी दुपारी ३ः०० (तीन) वाजता भरलेल्या माहे जुलै २०२० या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.**

विषय क्र.१/७४

संदर्भ - १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुद्रणालय/१५४ दि.२/७/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२९९,दि.७/७/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे विचारात घेवून -

मुद्रणमहर्षी मामाराव दाते मुद्रणालयामध्ये कोरोना संसर्गजन्य प्रादुर्भाव रोखण्यासाठी पुणे शहरात घरोघरी सर्व्हेक्षण करण्याकरिता विविध प्रकारचे फॉर्म छपाई करणेकामी मनपा मुद्रणालयात कागद शिल्लक नसल्याने कोरोना संदर्भात संपूर्ण पुणे शहरात घरोघरी सर्व्हेक्षण करण्यासाठी फॉर्म छपाई आवश्यक असल्याने व याकामी टेंडर प्रक्रियेद्वारे खरेदीस दिर्घ कालावधी लागू शकणार असल्याने तातडीच्या कामाकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७.३ (क) नुसार तातडीची बाब म्हणून मा.महापालिका आयुक्त यांच्या मान्यतेने आवश्यक कागद ६१ सें.मी. (२४'') = ६८ gsm पांढरा रिळ पेपर खरेदी करणेकामी स्थानिक बाजारातून कोटेशन मागविले असता पटेल पेपर कंपनी यांचा दर कमी आल्याने त्यांच्याकडून १४७०२ किलो कागद र.रु. ७,९०,३७९/- खरेदी केला असून त्याचे बिल दि.२९/४/२०२० रोजी पटेल पेपर कंपनी यांना अदा केले आहे.

सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेत येत आहे.

विषय क्र.२/७५

संदर्भ - १) मा.सौ.मानसी देशपांडे यांचे दि. १/७/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३१०,दि.१४/७/२०२०

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये एका इमारतीवरुन दुसऱ्या इमारतीवर ओव्हरहेड टि.व्ही. केबल, इंटरनेट/ब्रॉडबँड केबल तसेच ओ.एफ.सी. केबल टाकण्यासाठीची तरतुद नाही त्यामुळे अशा प्रकारच्या सर्व बेकायदेशीर केबल्स शहराचे विद्रुपीकरण करीत असल्याने काढुन टाकण्यात याव्यात.पुणे महानगरपालिकेमध्ये याबाबत योग्य ठराव करुन सदर सर्व प्रकारच्या टाकलेल्या ओव्हरहेड केबल्स आणि नव्याने टाकण्यात येणाऱ्या केबल्स यामध्ये सुसूत्रता आणून प्रती मीटर एकरकमी किंवा वार्षिक ठराविक शुल्क आकारुन त्यातून महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह विभाग आकारत असलेल्या शुल्काच्या प्रमाणात उत्पन्न मिळविता येईल. किंवा सदर सर्व केबल धारकांना इमारतीवरुन ओव्हरहेड केबल टाकण्यास मनाई करुन त्या सर्व केबल्स पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या भुमिगत डक्ट मधून टाकण्यास बंधनकारक करुन, केबल धारकांना प्रती मीटर एकरकमी किंवा वार्षिक शुल्क आकारुन महानगरपालिकेस मोठया प्रमाणात महसूल मिळवता येईल.तरी करोना विषाणूच्या संसर्गामुळे पुणे महानगरपालिकेच्या महसुलामध्ये घट झालेली आहे ती भरुन काढणेसाठी महानगरपालिकेचा महसुल वाढविण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

विषय क्र.३/७६

संदर्भ - १)मा.अमोल बालवडकर, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती,व मा.सौ.ज्योती कळमकर,मा.सौ.स्वप्नाली सायकर यांचे दि.२६/६/२०२० चे पत्र
२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २७ दि.२६/६/२०२०
३) मा.महेंद्र पठारे व मा.सौ.वर्षा तापकीर यांची दि. १४/७/२०२० ची उपसूचना.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.३१३,दि.१४/७/२०२०

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.९ बाणेर-बालेवाडी-पाषाण-सुतारवाडी -सोमेश्वरवाडी-पचंवटी भागात कचरा संकलन करण्यासाठी पुणे म.न.पा.कडून स्वच्छ संस्थेस अनुदानित करारानुसार नियुक्त करण्यात आले आहे. सदर संस्थेस वार्षिक ५ कोटीचे अनुदान म.न.पा.कडून दिले जाते,तरी देखील या भागात सदर संस्था मोनोपोली होत आहे. सदर संस्थेकडून या भागात व्यवस्थित कचरा संकलन होत नाही तसेच नागरिकांची गैरसोय होत असल्याच्या अनेक तक्रारी आमच्याकडे वारंवार प्राप्त होत आहेत.

तरी या भागात नागरिकांची गैरसोय थांबविण्याकरीता याभागातील काही सोसायटी व गावठाणात श्री.गजानन कृपा एन्टरप्रायजेस या संस्थेस कचरा संकलनासाठी कार्यरत करण्यात आले. या संस्थेमार्फत कोरोना काळात लॉकडाऊन असताना देखील या संस्थेने व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी अखंडपणे जीवाची बाजी लाऊन कोविड योध्याप्रमाणे काम केले व कचरा संकलन करून घेतले.

तरी या भागात कार्यरत असणारी स्वच्छ संस्था हि म.न.पा.अनुदानित आहे व या उलट श्री.गजानन कृपा एन्टरप्रायजेस ही संस्था विनाअनुदानित पध्दतीने कार्य करीत आहे. तसेच श्री.गजानन कृपा एन्टरप्रायजेस संस्था ही ओला कचरा हा ज्या-त्या सोसायटीमध्येच योग्य प्रकारे उपाययोजना करून जिरवण्याचे काम करीत आहे.याउलट स्वच्छ ही संस्था ओल्या कचऱ्याचे संकलन देखील करीत नाही.त्यामुळे सोसायटी व वस्त्यांमध्ये ओला कचरा विल्हेवाट लावण्याची गैरसोय होत आहे. तसेच स्वच्छ संस्थेस पुणे म.न.पा.च्या अनुदानासोबतच कचरा घंटागाडी व इतर सोयीसुविधा तसेच साहित्य देखील पुरविले जाते परंतु श्री.गजानन कृपा एन्टरप्रायजेस या संस्थेस कोणत्याही प्रकारची सोयी सुविधांची मागणी पुणे म.न.पा.कडे करीत नाही व स्व: कार्यरत पध्दतीने याभागात काम करीत आहे.

तरी सदर श्री.गजानन कृपा एन्टरप्रायजेस या संस्थेस बाणेर-बालेवाडी भागामध्ये काम करण्याची परवानगी देण्यास तसेच श्री काळभैरवनाथ विकास प्रतिष्ठान व श्री.सदगुरु शंकर महाराज महिला उन्नती संस्था यांना सहभागी करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.४/७७**

संदर्भ - १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१६२ दि. ९/७/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३१८,दि.१४/७/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७,(३)(क) मधील तरतुदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणु प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत उदभवलेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये पुणे शहरातील नायडु सांसर्गिक रुग्णालय येथे लॉन्ड्री मशिन मे मेकर्स अॅण्ड मर्चटस्, पत्ता फरिदाबाद, हरियाना, १२१००३ यांचेकडून खरेदी करुन त्यांना त्या मोबदल्यापोटी र.रु. ३,७२,८८०/- चे बिल अदा केले असून सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.५/७८**

संदर्भ - १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१६५ दि.१४/७/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.३१९,दि.१४/७/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

डॉ.नायडू सांसर्गिक रोग रूग्णालय व कोव्हिड केअर सेंटरसाठी लागणा-या ऑक्सिजन जम्बो सिलेंडर, ऑक्सिजन सिलेंडर १०.२ मेडिकल ग्रेड,ऑक्सिजन रेग्युलेटर,स्पॅनर,टयुबिंग विथ मास्क,व सिलेंडर ट्रॉली इ. इ. अॅटम्सची खरेदी करणेकरीता कोटेशन मागविले असता आलेल्या पाच कोटेशनपैकी मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे पाच अॅटम्सची क्वॉलीसर्ज सर्जिकल्स प्रा.लि. यांचेकडून रक्कम रूपये १७,४२,२७५/- आणि अंशुष इनोव्हेटिव्ह क्रियेशन्स यांचेकडून रक्कम रूपये ७,४९,५७५/- जीएसटी करासह एकुण रक्कम रूपये २४,९१,८५०/- (अक्षरी रक्कम रूपये चोवीस लाख एक्यानव हजार आठशे पन्नास फक्त ) पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) क अन्वये खरेदी करण्यात येणार असून त्यांचेकडून आवश्यक तो करारनामा करण्यात येणार असल्याने सदरच्या बाबीस पश्चात मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

नगरसचिव
पुणे महानगरपालिका